**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६/२०२६ मधील**
**निशाणी क्र. १ खालील आदेश.**
**राहिबाई वि. कोणी नाही**
CNR No. MHBI160000442026

प्रस्तूतचा अर्ज हा अर्जदार याने बॉम्बे रेग्यूलेशन अधिनियम १८२७ च्या तरतुदी अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार ही अर्जात नमुद पत्यावरील रहिवाशी आहे. मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप हे मौजे वंजारवाडी येथील रहिवासी होते व ते दिनांक ०९/१२/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार ही मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांची मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांना इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांचे मृत्यु पश्चात अर्जदार यास शासकीय, निमशासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी वारस दाखल्याची गरज आहे. करीता अर्जदार याने ती मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांचा एकमेव वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेसाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदार याने त्याचे कथनांचे पुष्ठयर्थ निशाणी ०६ वर मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी ४ च्या यादीलगत अर्जदार यांचे ओळखपत्र म्हणून त्यांच्या आधारकार्डच्या प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जाच्या पृष्ठयार्थ अर्जदार याने निशाणी ११ वर त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदार याने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली असुन अर्जातील मागणीस अनुसरुन वारसा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

४. अर्जातील कथनास अनुसरुन जाहीरनामा निशाणी ७ काढण्यात आला.

त्याचप्रमाणे दिनांक १५/०१/२०२६ रोजी बीड सिटीझन या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार अर्जदार हिस तीच्या मागणी प्रमाणे ती मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांचा वारस असले बाबत दाखला देणेसंदर्भात हरकती मागविण्यात आल्या. परंतु, विहीत कालावधीत कोणीही न्यायालयात हजर राहून अर्जदार यास त्याचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेबाबत हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदार याचे मार्फत अभिलेखावर आलेला तोंडी पुरावा व त्याबाबत वरील विवेचना वरून असे दिसून येते की, अर्जदार हिने त्याचे पुराव्यात मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप हिस ती एकमेव वारस असल्याचे शपथेवर कथन केले आहे. अर्जदाराचे सदरचे कथन कोणीही आव्हानलेले नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा आहे तसा स्वीकारणे क्रमप्राप्त होते. परिणामी अर्जदाराच्या उपलब्ध पुराव्यावरून अर्जदार ही मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांची कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. करीता अर्जदार त्याचे मागणीप्रमाणे ती मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांची कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार ही मयत प्रयागाबाई भ्र. विठ्ठल सानप यांची वारस असले बाबतचे वारस प्रमाणपत्र सिव्हील मॅन्युअलचे भाग १४ परिच्छेद क्र.३१२ नुसार योग्य त्या कोर्ट फी रकमेवरती जारी करण्यात यावे.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.03.27 16:16:59 +0530

स्थळः– शिरूरकासार. **(अ.सं.जगताप)**
दि. २५/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरूरकासार.